Impact Factor 3.025

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

UGC Approved Monthly Journal

VOL-IV | ISSUE-VIII | Aug. | 2017

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
- (+91) 9922455749, (+91) 8999250451

Email
- aiirjpramod@gmail.com
- aayushijournal@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# रा.रं. बोराडे यांच्या कथांमधील दलित अत्याचाराचे चित्रण

**प्रा.डॉ.लहू दिगंबर वाघमारे**
मराठी विभाग,
शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव,
ता. चाकूर, जि. लातूर.

इ.स.१९६२ साली प्रकाशित झालेल्या 'पेरणी' या कथासंग्रहाने रा.रं.बोराडे हे मराठीतील एक लोकप्रिय व मान्यवर कथाकार म्हणून प्रसिध्द झाले.अलीकडेच प्रकाशित झालेल्या 'अगं अगं मिशी' या कथासंग्रहापर्यंत त्यांची लेखनपरंपरा दाखवता येते.त्यांचे कथालेखन विपुल आणि समृध्द असे आहे. 'पेरणी', 'ताळमेळ', 'मळणी', 'वरात', 'नातीगोती', 'बोळवण', 'वाळवण', 'फजितगाडा', 'माळरान', 'राखण','गोंधळ', 'बुरूज','वानवळा', 'खोळंबा', 'हेलकावे', 'कणसं आणि कडबा', 'हरणी', 'अगं अगं मिशी' असे एकूण १८ कथासंग्रह त्यांनी लिहिलेले आहेत.या विविध कथासंग्रहांतून ग्रामव्यवस्थेतील विविध भाव-भावना आणि ग्रामीण जनतेचे विविध प्रश्न त्यांनी अत्यंत प्रभावीपणे मांडले आहेत.या काही कथासंग्रहांतून जरी विनोद आढळत असला तरी काही कथासंग्रहांतील काही विशेष कथांमधून ग्रामीण जनतेच्या जीवनातील गंभीरता अत्यंत संवेदनशीलतेने मांडलेली आहे.ग्रामव्यवस्थेतील अनेक वर्तमानकालीन समस्यांबरोबरच ग्रामव्यवस्थेचाच एक भाग असलेल्या;परंतु दुर्लक्षित असलेल्या दलित जीवनातील काही समस्या त्यांनी कथालेखनातून मांडल्या आहेत.त्यांच्या या कथालेखनातील दलितांच्या जीवनातील अन्याय, अत्याचाराचे व त्यांच्या शोषणाचे विवेचन पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल-

ग्रामीण भागातील दलितांना वर्णव्यवस्थेच्या बंदिस्त चौकटीत उपेक्षेचे आणि वेदनेचे जीवन जगावे लागले. वर्णव्यवस्थेने त्यांची मानसिकता दुबळी करून टाकली आहे. म्हणूनच भूक, दारिद्र्य आणि अमानुष अन्याय-अत्याचार सहन करण्याची त्यांची क्षमताही इतर सर्व धर्मातील कोणत्याही मानवापेक्षा अधिक आहे. केवळ दैन्य, दारिद्र्य आणि भुकेचीच वेदना येथील दलितांना सहन करावी लागली नाही; तर अत्यंत अमानुष आणि पशुपेक्षाही कठोर अशा प्रकारचा अत्याचार त्यांना सहन करावा लागला.त्यांचे माणूसपणच या व्यवस्थेने नाकारले होते.त्यांच्या जगण्याचे सर्व मार्ग बंद केले होते.त्याला आपला गुलाम व दास समजून त्याच्यावर कठीण परिश्रम लादले होते.त्यामोबदल्यात त्याला केवळ शिळेपाके अन्न देण्यात येत होत.कधी सेवा करण्यात कसूर झाली तर त्याला जीवघेणी मारहाण करण्यात येत होती. त्यासाठी त्याला कोठे दाद मागण्याची व्यवस्थाही नव्हती.येथील सर्व व्यवस्था उच्चवर्णीयांच्याच हाती असल्यामुळे ते अस्पृश्य जातीच्या अज्ञानाचा, दारिद्र्याचा आणि मानसिक दुर्बलतेचा फायदा घेऊन त्याच्यावर अमानुष जातीय अन्याय-अत्याचार करीत होते. दलित समाजावरील या तत्कालीन जातीय अन्याय-अत्याचाराचा काही अंशी का होईना रा.रं.बोराडे यांनी आपल्या काही कथांमधून वेध घेतलेला आहे.यादृष्टीने त्यांची 'बुरुज' या कथासंग्रहातील 'मेंदी' ही कथा उल्लेखनीय आहे.

ग्रामीण भागामध्ये दलितांना गावकीची अनेक कामे करावी लागायची.तशीच उच्चवर्णीयांची अनेक वैयक्तिक कामेही करावी लागायची.प्रस्तुत 'मेंदी' कथेतील 'विठोबा' हा दलित असून तो कोतवाल आहे. म्हणून गावातील सर्व कामे तर तो करतोच त्याशिवाय इतरांची अनेक वैयक्तिक कामेही तो करतो. त्यासाठी आपली स्वत:ची वैयक्तिक कामे तो बाजूला ठेवतो.एखादे वेळी घरच्या कामामुळे सवर्ण व्यक्तीने सांगितलेले काम करता आले नाही तर त्याला मारहाण केली जाते.कोतवाल असलेल्या दलित विठोबाची

करुण कहाणी प्रस्तुत कथेतून व्यक्त झाली आहे. पंचमीच्या सणासाठी विठोबा आपल्या मुलीला सासरहून आणण्यास निघतो. अचानक धनाजी पाटील त्याला बोलावतो आणि आपली मुलगी सुमनबाई पंचमीच्या सणाला आली असून तिच्यासाठी "आजच्या आज गातेगावला जाऊन मेंदीची पानं खुडून आणायची.कुणी काय म्हणलं तर त्येला माजं नाव सांगायचं."[१] असा आदेश देतो.विठोबा आगतिकपणे आपण मुलीला आणण्यासाठी निघाल्याचे सांगतो.धनाजी पाटील विठोबाला मुलीला आणण्यासाठी उद्या जाण्याचे आणि आज आपल्या मुलीसाठी मेंदी आणून देण्याचे सांगतो.विठोबाची स्वत:च्या मुलीला आणण्याची विनंती पुन: पुन्हा ऐकून पाटील धमकीच्या सूरात विठोबाला म्हणतो,"म्हंजी आज जात न्हाईस म्हण की."[२] तेव्हा या प्रश्नाला उत्तर देताना विठोबा विनवणीच्या सूरात आज जाण्यास जमणार नसल्याचे सांगतो.विठोबाच्या या अदबीने दिलेल्या उत्तरानेही धनाजीराव खवळतो आणि आपल्या विरुध्द पार्टीच्या तात्यारावच्या विठोबाने केलेल्या विविध कामाबद्दल तिरस्कार व्यक्त करत बैठकीच्या खाली उडी टाकून दोनच ढांगेत विठोबाच्या जवळ येऊन एक सणसणीत चपराक त्याच्या गालावर ठेवीत म्हणतो, "मगापासून म्या बगायलोय आज कसं जमल. म्हणून लईच पिरपिर लावलीस.कसं जमत न्हाई ते म्या बगतो.आजच्या आज मेंदी वाड्यात आली फायजी.न्हाई आज मेंदी वाड्यात आली तर मंग म्या हाय अन् तू हाय. जा, निघ जा हितनं."[३] धनाजीरावच्या या संवादातून त्याची जातीयवादी व वर्णवादी मनोवृत्ती व्यक्त होते.उच्चवर्णीय अर्थात सवर्ण समाजातील पाटील आणि देशमुख येथील दलितांना आपले बटिक समजून त्यांना दिवस-रात्र राबवून घेतात. त्यातही ती सवर्ण व्यक्ती राजकारणातील पुढारी असेल तर आपल्या विरुध्द असलेल्या पार्टीतील एखाद्या व्यक्तीचे काम दलित गावकामगाराने केले आणि आपले काम त्याच्या व्यक्तिगत अडचणीमुळे करण्यास जमले नसेल तर त्या दलितांना मार खावा लागतो.हे विदारक सत्य या कथेतून रा. रं. बोराडे यांनी मांडले आहे. पाटील, देशमुखाच्या अहंकारी वृत्तीमुळे दलितांची ससेहोलपट होते.दलितांना वैयक्तिक जीवनच नाही.ते सतत आपल्या सेवेत असले पाहिजेत, अशीच प्रत्येक सवर्ण व्यक्तीची मानसिकता आहे. ही मानसिकता त्यांच्या उच्चवर्णीय जातीतूनच त्यांच्यामध्ये निर्माण झाली आहे.प्रस्तुत कथेतील दलित कोतवाल विठोबा आणि धनाजीराव पाटील ही दोन पात्रे प्रातिनिधिक रूपात रा. रं. बोराडे यांनी चित्रित केली आहेत. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात सर्वत्रच ही परिस्थिती होती. स्वातंत्र्यानंतरही त्यात पूर्ण बदल झाल्याचे दिसून येत नाही.वर्तमानकाळातही अनेक खेड्यांत कोतवाल या पदावर दलित व्यक्तीच कार्यरत आहेत. त्यांना आजही गावातील अशा अनेक सवर्ण पाटील-देशमुखाच्या घरची कामे करावी लागतात. त्यासाठी स्वत:च्या घरची कामे दूर ठेवावी लागतात.दलितांचे हे शोषण सवर्णांच्या जातीय अहंकारातून होते.रा.रं.बोराडे यांनी ग्रामीण समाजातील या दलितांवरील अत्याचाराचे अत्यंत सूक्ष्म निरीक्षण केल्यामूळे प्रस्तुत कथेतून ते जिवंतपणे व्यक्त झाले आहे.

दलितांवर उच्चवर्णीयांकडून होणारे जातीय अत्याचार हे केवळ त्यांचे सामाजिक शोषण करण्यापुरते किंवा त्यांना मारहाण करण्यापुरतेच नाहीत; तर त्यांचा जात्याभिमान जागा झाला तर ते त्यासाठी एखाद्या दलित व्यक्तीला पूर्णपणे उद्ध्वस्त करण्याचे, त्यांच्यावर हिंसाचार करण्याचे, त्याला इजा करून ठार मारण्याचे कारस्थान रचू शकतात.याचा प्रत्यय रा.रं.बोराडे यांच्या 'हरणी' कथसंग्रहातील 'घात-अपघात' या कथेतून येतो.या कथेतील माधवराव साबळे हे सवर्ण, जात्याभिमानी, श्रीमंत आणि सरंजामशाही वृत्तीचे आहेत.तसेच ते तुसड्या, चिडखोर आणि संतापी स्वभावाचे आहेत.ते राजकारणातही मुरलेले असून साखर कारखान्याचेही चेअरमन आहेत.त्यांच्याच कारखान्यातील ज्युनिअर इंजिनिअर असलेल्या व दलित असलेल्या धनंजय जेवळीकर या युवकांचे माधवराव साबळे यांच्या बेबी या थोरल्या मुलीबरोबर प्रेमसंबंध आहेत.बेबी पुण्याला पदवीचे शिक्षण घेते.ती मुलीच्या वसतिगृहात राहते.एकदा ते

आपल्या मुलीला भेटण्यासाठी पुण्याला जातात तेव्हा या दोघांचे एकमेकांना खेटून बोलत, हसत, खिदळत चालणे ते स्वत:च्या डोळ्यांनी पाहतात.त्यांच्या संतापाचा भडका उडतो ते अस्वस्थ होतात.मुलीला भेटण्याचा बेत रद्द करून गावी येतात.घरी आल्यावर ते आपल्या पत्नीलाही याबद्दल काही सांगत नाहीत. आपल्या कारखान्यातील एकनाथ ठुबे यांना बोलावून घेऊन अत्यंत सावधपणे ही घटना त्यांना सांगतात. या दोघांचे प्रेमसंबंध जुळण्यास एकनाथ ठुबेच कारणीभूत असल्याचा दोष ते ठुबे यांना देतात. कारण पुण्याला बेबीला सोडण्यासाठी ठुबे हे नेहमी जेवळीकरांनाच गाडी देऊन सोबत पाठवितात.याचा भयंकर संताप त्यांना येतो.माधवराव साबळे हे सवर्ण असल्याने त्यांना आपल्या मुलीने दलित असलेल्या धनंजयवर प्रेम करणे अत्यंत अपमानास्पद वाटते."आपल्याच कारखान्यातल्या खालच्या जातीतल्या एका नोकरानं आपल्या मुलीवर प्रेम करावं?"[४] हा प्रश्न त्यांना अस्वस्थ करतो.ते भयंकर चिडतात, त्यांचा जात्याभिमान जागृत होतो.ते जेवळीकरांबद्दलची सर्व वैयक्तिक माहिती एकनाथ ठुबेंना विचारतात.यासंदर्भात ठुबेंचा सल्ला घेतात. ठुबे त्यांना जेवळीकरांचा राजीनामा घेण्याचा आणि बेबीचे शिक्षण बंद करण्याचा सल्ला देतो. "एक खालच्या जातीचा पोरगा माजा जावाई व्हणार म्हणून लोक बोलायला लागतेल.माजे विरोधक याचा फायदा उपटतेल. समदीकडं माजी बदनामी करतेल."[५] असे त्यांना वाटते. म्हणून खासदार नामदेवराव जगदाळे यांच्या संभाजीराव या डॉक्टरकीची परीक्षा दिलेल्या मुलाला ते आपला जावई करून घेण्याचा विचार करतात. त्यासाठी जेवळीकरांना उद्ध्वस्त करण्याचा बेत ते आखतात.हा बेत एकनाथ ठुबे यांना सांगताना ते म्हणतात, "तुमच्या सेक्शनमधला स्टीम डिस्टीबटरचा जॉईंट लिक ठिवा.एकांद्या कामाच्या निमित्तानं त्या निमकहराम जेवळीकराला त्या हेडच्या म्होरं आना अन् द्या खोलून वरचा वाल.त्या भडव्याचं तोंड असं भाजलं फायजी की त्याला बी बेबीला तोंड दावायची लाज वाटली फायजी, आन् त्याचंबी तोंड बगायची आपल्या बेबीला लाज वाटली फायजी."[६] एकनाथ ठुबे या कटातील व बेबीच्या लग्नातील पुढील काही धोके सांगतात.तेव्हा माधवराव साबळे एकनाथ ठुबेच्या मुलीचे लग्न करून देण्याचे व सर्व खर्च आपण स्वत: करण्याचे आमीष ठुबेंना देतात.जेवळीकरांनी आपल्या मुलीशी लग्न करू नये कारण तो जरी इंजिनियर असला तरी जन्माने दलित आहे. म्हणून हे लग्न टाळण्यासाठी माधवराव साबळे वाटेल ती किंमत मोजण्यास तयार असतात.या देशातील वर्णव्यवस्थेचे कट्टर समर्थक आणि प्रतिनिधी म्हणून माधवराव साबळे या कथेतून येतात.आपण सवर्ण असून जेवळीकर दलित असल्यामुळे आपल्या मुलीने त्याच्याबरोबर लग्न करणे त्यास अपमानाचे व बेअब्रूचे वाटते.म्हणून ते जेवळीकरांचे तोंड भाजण्याचा बेत आखतात.या देशातील मनुवादी व्यवस्था व तिची जातिव्यवस्था येथील सवर्णांच्या मनामध्ये एवढी पक्की भिनली आहे की, ती उधळून लावणाऱ्या एखाद्या दलित व्यक्तीला ते आपल्या जात्याभिमानासाठी नष्ट करतात, त्याचा विध्वंस करतात.हे ग्रामीण भागातील वर्तमानकालीन विदारक सत्य रा.रं.बोराडे या कथेतून मांडतात.प्रस्तुत कथा ही भास्कर चंदनशिव यांच्या 'नवी वारूळं' या कथासंग्रहातील 'स्फोट' या कथेशी साम्य असणारी आहे. भास्कर चंदनशिव यांनी या कथेचे कथानक याहीपुढे नेऊन पूर्णत्वास नेले आहे.एकनाथ ठुबे व जेवळीकर यांचे जिव्हाळ्याचे संबंध असल्याने ते ही सर्व हकीकत जेवळीकरांना सांगून हा बेत उधळून लावतात तसेच जेवळीकर आणि बेबी यांचे पुण्यात लग्नही घडवून आणतात.पत्रकार आणि कारखान्याचे विरोधक यांना माहिती देऊन मदत करतात व माधवराव साबळे यांना उद्ध्वस्त करतात.असे हे कथानक भास्कर चंदनशिव यांनी पूर्ण केले आहे.हे दोन्ही कथाकार मराठवाड्यातील आणि समकालीन असल्यामुळे मूळ कथा कोणती व त्या कथेवर आधारित लिहिलेली नंतरची कथा कोणती याचा उलगडा होत नाही.प्रस्तुत कथेतून रा.रं.बोराडे यांनी दलितांवरील होणारे अमानुष अत्याचार अत्यंत जिवंतपणे मांडले आहेत.

सवर्ण समाजाकडून दलित व्यक्तीवर होणाऱ्या अत्याचाराचे चित्रण करणारी रा.रं.बोराडे यांची 'वाळवण' या कथासंग्रहातील 'कोंडण' ही कथा उल्लेखनीय आहे.या कथेतील गंगा मांग गरीब, दरिद्री आणि दुर्बल आहे. आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालविण्यासाठी तो म्हैस पाळतो.त्या म्हशीला चारण्यासाठी त्याच्याकडे शेती किंवा कुरण नसल्याने तो आपल्या 'सिदा' या मुलाला दररोज रात्री म्हैस चारण्यासाठी इतरांच्या शेतीवर पाठवितो.एके दिवशी 'सिदा' हा 'लिंबाजी' या सवर्ण शेतकऱ्याच्या शेतावर जातो.म्हशीच्या पाठीवर बसून म्हैस चारतो.म्हशीच्या पाठीवरच त्याला झोप लागते.तशात लिंबाजी नजर राखून त्याच्यावर झडप घालतो व सपकन त्याच्या पाठीवर हात ओढतो.या माराने सिदा दुमता होतो.काल म्हैस चारण्यासाठी आल्याचे कबूल करून घेण्यासाठी लिंबाजी त्याच्या कमरेत लाथा घालतो.सिदा वाकडातिकडा होतो आणि गवतात जाऊन पडतो.माराच्या भीतीने तो कबूल होतो.लिंबाजीने म्हैस मांगवाड्यात आणली.गंगाच्या रडण्याने मांगवाडा जागा झाला.त्यात सिदाचा बाप गंगाही होता.गंगानेच सिदाला म्हैस चारण्यासाठी पाठवूनसुध्दा तो सिदाला लिंबाजीच्या समोर मारतो.आपली म्हैस कोंडणात जाऊ नये म्हणून तो प्रयत्न करतो.प्रस्तुत कथेतील लिंबाजीच्या या वर्तनातून दलितांवरील जातीय अत्याचार व्यक्त होतो.दलित समाज हा दरिद्री, दुर्बल असून तो जगण्यासाठी पूर्णपणे सवर्णावर अवलंबून आहे. याचाच फायदा घेऊन सवर्ण दलितांना क्रूरपणे मारहाण करतात.वर्णाधीष्ठित समाजव्यवस्थेतील अत्यंत भयावह अशा सामाजिक व आर्थिक विषमतेचे दर्शन या कथेतून रा.रं.बोराडे यांनी घडविले आहे.

ग्रामव्यवस्थेत दलित समाजाला अत्यंत हीन समजले जाते.त्यांच्या सावलीचासुध्दा विटाळ मानला जातो; मग त्यांचा स्पर्श तर दूरच.वर्तमानकाळात दलित समाज लोकशाहीमुळे आणि स्वातंत्र्यामुळे विकसित झाला आहे.काहीचा आर्थिक स्तरही सुधारला आहे.दलित समाजातील व्यक्ती नोकरीच्या आणि उद्योगधंद्याच्या निमित्ताने शहरात वास्तव्य करीत आहेत;परंतु त्यांच्या मूळ गावातील उच्चवर्णीय किंवा सवर्ण समाजाचा त्यांच्याकडे पाहण्याचा पारंपरिक दृष्टिकोन अजूनही बदललेला नाही. शहरात काही अंशी त्यांना मान-सन्मान व प्रतिष्ठा मिळते, उच्च-नीचतेची आणि जातीयतेची भावना त्यांना फारशी अनुभवायला येत नाही; परंतु हेच दलित जर आपल्या मूळ गावी गेले तर तेथे मात्र त्यांना आजही तुच्छ लेखले जाते.हे ग्रामीण भागातील विदारक सत्य रा.रं.बोराडे यांनी आपल्या 'कणसं आणि कडबा' या कथासंग्रहातील 'दिमाख' या कथेतून एका दलित स्त्रीच्या चित्रणातून सूचकतेने चित्रित केले आहे.

प्रस्तुत कथेची दलित नायिका राधिका ही आहे.राधिकाचे लग्न होऊनसुध्दा तिच्या नवऱ्याने तिला सोडून दिले म्हणून ती स्वत: काबाडकष्ट करते. तिची बहिण तिला मुंबईला नेते; परंतु तेथेही बहिणीचा नवरा तिच्याशी लगट करण्याचा प्रयत्न करतो त्यामुळे बहिणीचा संसार उद्ध्वस्त करण्यापेक्षा ती मुंबईतच सलीमची रखेल म्हणून राहते.सलीम हा श्रीमंत असल्यामुळे तिला त्याच्याकडून सर्व प्रकारची सुखे मिळतात.पाच वर्षांनंतर जेव्हा ती आपल्या माहेरी येते तेव्हा ती पूर्णपणे बदललेली असते.ती गावातील बसस्थानकावर उतरल्यानंतर तिला आपल्याजवळील सुटकेस घरापर्यंत नेण्यासाठी हमाल शोधूनही मिळत नाही. तेव्हा दत्तू खराड्याच्या मुलास ती या कामासाठी पाच रुपये देण्याचे मान्य करते.तेव्हा दत्तू खराडे आपल्या हानम्या या लहान मुलाला तिच्यासोबत सुटकेस घेऊन जाण्यास सांगतो;परंतु ती आपल्याच गावातील म्हसा मांगाची राधिका आहे असे कळल्यावर मात्र त्याची भूमिका बदलते.मांगाच्या बाईचं ओझे आपल्या पोराने वागवीत नेल्याचे गावात कळाले तर गावात सर्वत्र आपले हसू होईल म्हणून तिला म्हणतो, "राधा, तू दुसरा कुणीबी हमाल बग, माझ्या पोराला तेव्हढ्या लांब यायला जमायचं न्हाई."[७] प्रथम ती सवर्णाचीच आहे असे वाटल्यामुळे आणि पाच रुपये देण्यास तयार असल्यामुळे ती सुटकेस घेऊन जाण्यासाठी तो आपल्या मुलास सांगतो; परंतु ती आपल्या गावातील म्हसा मांगाची मुलगी आहे हे

कळल्यानंतर मात्र त्याचा जातीय अहंकार जागा होतो.या वर्णाभिमानामुळे तो ती सूटकेस नेण्यास नकार देतो. या देशात प्रत्येक माणसाच्या जन्मासोबत आलेली जात व वर्णाभिमान जन्मभर माणसाला कसा चिकटून राहतो याचे चित्रण लेखक या कथेतून करतात.पैशापेक्षाही जातीची प्रतिष्ठा सवर्ण समाजाला महत्त्वाची वाटते.माणसाला कनिष्ठ ठरवून त्याची पशुपेक्षाही अत्यंत हीन दर्जाची विटंबना केली जाते, त्याचा विटाळ माणून त्याची अत्यंत क्रूर अशा प्रकारची अवहेलना केली जाते याचे प्रत्यंतर या कथेतून घडते.ग्रामव्यवस्थेतील भीषण जातीयतेचे व उच्च-नीचतेचे, वर्णव्यवस्थेचे वास्तव चित्रण रा.रं.बोराडे यांनी केले आहे.राधिकाचा सर्वांगीण दृष्टीने विकास झाला; परंतु तिची जात मात्र बदलली नाही.म्हणूनच दत्ता खराड्याच्या दृष्टीने ती 'मांग' म्हणजेच अस्पृश्य आहे.म्हणून तो तिची सुटकेस तिच्या घरापर्यंत आपल्या मुलाकरवी पोहोचविण्याचा बेत रद्द करतो.रा.रं.बोराडे यांच्या या कथेतून भारतीय समाजजीवनातील अस्पृश्यतेचे अत्यंत दाहक रुप जिवंतपणे व्यक्त झाले आहे.

दलितांच्या दलितत्वाची व उच्च-नीच समाजव्यवस्थेची अनुभूती रा.रं.बोराडे यांच्या 'बुरुज' या कथासंग्रहातील 'पाणी' या कथेतूनही येते.अनेक पाणाड्यांनी शेतात पाणी दाखवूनसुध्दा नारायणरावांच्या शेतातील विहिरीला पाणी लागत नाही.म्हणून हतबल होऊन शेतात विहीर पाडण्याचा विचार नारायणराव डोक्यातून काढून टाकतो;परंतु पांगरीचा दलित गानू पाणाड्या त्याच शेतात पाणी दाखवतो आणि त्याने दाखविलेल्या ठिकाणी पाणी लागले.त्यामुळे नारायणराव अत्यंत आनंदी होतात आणि गानू पाणाड्याला मागेल ते देण्याचे मान्य करतात.गानू पाणाड्या काहीच घेत नाही, "पर कवाकाळ फिरला आन् माजं पोरगं उघडं पडून तुमच्या दाराला आलं तर त्येला तेवढं झाकायचं करा."[८]एवढीच अपेक्षा तो त्यांच्याकडून करतो आणि मरताना आपल्या मुलाला त्याची आठवण करून देतो.पुढे गानूची बायको आजारी पडल्यामुळे त्याचा मुलगा नारायणरावाकडे येतो.नारायणराव त्याला आत बोलावतात, पण तो मुलगा डहाळजच्या जोत्यावर बसतो. यावरून त्या मुलाचे दलितत्व सिध्द होते. त्याचे हे दलितत्त्व व्यक्त करताना प्रकाश मेदककर लिहितात, "'पाणी' कथेतील गानू पानाड्याचे आणि त्याच्या मुलाचे दलितत्व कथेच्या शेवटी शेवटी "तो सरळ आत आला, डहाळजच्या जोत्यावर बसला" या वाक्यातून पुसटपणे सूचित केले जाते."[९] या कथेतील दलितत्व असे दलित मुलाच्या कृतीतून अप्रत्यक्षरित्या व्यक्त होते. गानूचा मुलगा आपल्या आईच्या दवाखान्यासाठी नारायणरावाकडे दोन-चारशे रुपयांची मागणी करतो; परंतु नारायणरावाची बुध्दी फिरते आणि तो आपल्याकडे पैसे नसल्याचे सांगतो.म्हणून तो मुलगा परत जातो आणि नारायणरावाच्या विहिरीचे पाणी एकाएकी आटून जाते.या कथेत जरी दलितांच्या अन्याय-अत्याचाराचे चित्रण येत नसले तरी त्याच्या दारिद्र्याचे, ग्रामीण भागातील सवर्णांकडून पाळल्या जाणाऱ्या जातीयतेचे आणि दलितांच्या दलितत्वाचे चित्रण येते.

भारतीय समाजजीवनातील व ग्रामीण भागातील कट्टर जातीयतेचे चित्रण रा.रं.बोराडे यांनी आपल्या 'कणसं आणि कडबा' या कथासंग्रहातील 'वेस' या कथेतून घडविले आहे.प्रस्तुत कथेतून वेशीबरोबरच ग्रामीण भागातील हेवेदावे, गटबाजी, राजकारण याचेही दर्शन घडते.ग्रामीण भागात पारंपरिकतेने वेस ही महत्त्वाची मानली जाते.कारण ते गावाचे प्रवेशद्वार असते; परंतु ते दलितांच्या शोषणाचे प्रतीक आहे.कारण वेशीच्या आत प्रवेश करताना दलितांना विशिष्ट नियम पाळावे लागायचे. वेशीच्या आतला तो सवर्ण आणि वेशीच्या बाहेरचा अस्पृश्य, अशीच खेड्याची रचना असून तिच्यामुळे दलित व सवर्ण यांच्यातील अंतर राखले जाते.म्हणूनच ही 'वेस' पाडली पाहिजे अशी दलित रोहिदासची इच्छा आहे; परंतु रोहिदासचा बाप केरबा महार मात्र सरपंच असलेल्या व उच्चवर्णीय असलेल्या रंगनाथरावाच्या पार्टीतील ग्रामपंचायतीचा सदस्य आहे.म्हणून तो वेस पाडण्याचा ठराव मांडण्यास धजावत

नाही. रंगनाथरावाच्या पार्टीतील केरबा आणि चांगदेव या दोन दलित मतांवर वेस पाडण्याचा ठराव मंजूर होणे अशक्य आहे असे केरबाला वाटते; परंतु रोहिदासने आपल्या वडिलांना आव्हान दिल्याने व चांगदेवने प्रेरित केल्याने केरबा वेस पाडण्याचा ठराव मांडण्याचे निश्चित करतो. या कार्यासाठी रंगनाथरावाच्या विरोधी पार्टीतील चार सदस्य वेस पाडण्यास पाठिंबा देतील, असे रोहिदास सांगतो. हा प्रसंग ओळखून रंगनाथराव केरबाला प्रलोभने देतात, धमकावतात. प्रसंगी शेवटी ठरावाच्या दिवशी आपल्या सरपंचकीचा राजीनामा देतात व ही वेस पडू नये यासाठी केरबालाच सरपंच करतात. हिंदू धर्मातील सवर्ण आपला जात्याभिमान व वर्णव्यवस्था टिकविण्यासाठी इतर कोणत्याही गोष्टींचा त्याग करतात, वाटेल ती किंमत मोजतात हेच यातून प्रतित होते. भारतातील खेड्यांतून रुढ असलेल्या उच्च-नीचतेचे व वर्णव्यवस्थेचे भीषण असे रूप लेखकांनी या कथेतून व्यक्त केले आहे. प्रस्तुत कथेतील सरंजामी मनोवृत्तीचे आणि दलितांच्या स्वाभिमानाचे चित्रण करताना डॉ. एस.एम. कानडजे म्हणतात, "दलित आणि सवर्ण यांच्यातील भेदांचे मूर्त प्रतीक असलेल्या वेशीवरून निर्माण झालेला एका गावातील सामाजिक आणि राजकीय संघर्ष हा 'वेस' या कथेतील मुख्य विषय आहे. तिच्यात पारंपरिक सरंजामी मनोवृत्ती आणि नवजागृत दलितांच्या अस्मितेची अभिव्यक्ती यांच्यातील ठिणगीचा नाट्यपूर्ण आविष्कार आहे."[१०] प्राचीन काळी खेड्याची रचना करताना या वेशीची सीमा आखण्यात आली आणि वेशीच्या आत सवर्णांची, तर बाहेर दलितांची वस्ती अशी निवासाची स्थाननिश्चिती करण्यात आली. जुन्या काळी अज्ञान, अंधश्रध्दा, रूढी, परंपरा आणि गैरसमजातून ही वेशीची सीमा आखण्यात आली होती. परंतु आधुनिक युगात तरी ज्ञानप्रसार, विज्ञानाची प्रगती, नवी राज्यघटना व तिच्यावरील समता मूल्ये, मानववंशशास्त्राचा शोध यामुळे ही वेशीची सीमारेषा पुसट व्हायला पाहिजे होती; परंतु ती तशी न होता अधिक गडदपणाने जाणवायला लागली आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडातही वेस पडू नये म्हणून ग्रामीण भागातून युध्दपातळीवर प्रयत्न केले जातात. प्रस्तुत कथेतील रंगनाथराव व सर्व सवर्ण मंडळी याचे प्रातिनिधिक रूप आहे. वर्तमानकालीन जातिव्यवस्थेचे अत्यंत उग्र रूप या कथेतून प्रत्ययकारी झाले आहे.

**निष्कर्ष :-**

१) रा.रं.बोराडे हे ग्रामीण साहित्यिक आहेत.
२) रा.रं.बोराडे यांनी ग्रामीण भागातील दलित समाजाचेही चित्रण केले आहे.
३) रा.रं.बोराडे यांच्या कथांतून भीषण जातीभेदाचे चित्रण आले आहे.
४) दलित समाजाला गावकीच्या कामामुळे खूप त्रास सहन करावा लागला हे रा.रं.बोराडे यांनी अनेक कथांमधून चित्रित केले आहे.
५) रा.रं.बोराडे यांच्या कथांमधील दलित व्यक्ती नाविलाजाने जगण्यासाठी गुन्हेगारीकडे वळताना दिसतात.
६) रा.रं. बोराडे यांनी दलितांच्या राजकीय शोषणाचेही चित्रण केले आहे.
७) रा.रं.बोराडे यांच्या कथेतील दलित पात्रे कुटुंबाच्या रक्षणासाठी अनेक प्रकारच्या तडजोडी करताना दिसतात.
८) रा.रं.बोराडे यांच्या कथेतील दलित व्यक्तींनी स्वाभिमानी दलित व्यक्तींना ठार मारण्याचे अघोरी कृत्य सवर्णांकडून होत असल्याचे चित्रण आले आहे.
९) रा.रं.बोराडे यांच्या कथेतील सवर्ण पात्रे दलितांच्या सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक दुर्बलतेचा गैरफायदा घेताना दिसतात.

## संदर्भ सूची :-

१. रा. रं. बोराडे, 'बुरूज', अक्षर प्रकाशन, औरंगाबाद, पहिली आवृत्ती १९७८, पृष्ठ ५४.
२. तत्रैव, पृष्ठ ५५.
३. तत्रैव, पृष्ठ ५६.
४. रा. रं. बोराडे, 'हरणी', राजकिरण प्रकाशन, इस्लामपूर, प्रथमावृत्ती २००२, पृष्ठ ४६.
५. तत्रैव, पृष्ठ ४८.
६. तत्रैव, पृष्ठ ५०.
७. रा.रं.बोराडे, 'कणसं आणि कडबा', साकेत प्रकाशन, औरंगाबाद, पहिली आवृत्ती १९९४, पृष्ठ ६९.
८. रा. रं. बोराडे, 'बुरूज', अक्षर प्रकाशन, औरंगाबाद, पहिली आवृत्ती १९७८, पृष्ठे ४६ - ४७.
९. (संपा.) रवींद्र किंबहुने, 'प्रतिष्ठान', मे-जून-जुलै-ऑगस्ट १९९७, पृष्ठ ५३.
१०. डॉ. एस. एम. कानडजे, 'पीळ आणि पैलू' (रा.रं. बोराडे यांच्या साहित्याचा अभ्यास), प्रतिभास प्रकाशन, परभणी, प्रथमावृत्ती २००७, पृष्ठ १३३.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com